साक्षरता प्रसारकाच्या प्रति एका निरक्षराचे निवेदन

लेखक - दयाळचंद सोनी

प्रथम प्रकाशन - १९९६

मराठी अनुवाद - सौ. सुजाता गोखले

प्रकरण १ ले

'खुराड्यातील कोंबडे जरी झाकले तरी पहाट व्हायची रहात नाही'

१. साक्षरता व शालेय शिक्षण मोहिमेचे प्रणेते, तळागाळातील गरीब, अडाणी, निरक्षर अशा लोकांचे सहाय्यकर्ते, त्यांना यातुन सोडवणारे प्रचारक, कृपाकरून तुम्ही माझेही म्हणणे ऐकून घ्या.

२. तुम्ही माझ्या गावामधे, माझ्याघरी पाहुणे म्हणून आलात, त्याबद्दल मी तुमचे मनापासून स्वागत करतो. तुमच्या माझ्या भेटीची मी योग्य ती कदर करतो.

३. तुम्ही ज्या घोषणा दिल्यात, जी गाणी म्हटलीत, माझे अज्ञान दूर करून मला जागृत करण्यासाठी जे ढोल-ताशे वाजवलेत त्याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे.

४. आपल्या सर्व शहरी-सुखसोयींचा त्याग करून मला भेटण्यासाठी आपण माझ्याघरी पायधूळ झाडलीत म्हणून मी आपला आभारी आहे.

५. आपण केलेले सर्व उपदेश मी अतिशय लक्षपूर्वक ऐकले आहेत. आपल्याला माझ्याविषयी जो कळवळा वाटतो त्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

६. आम्ही निरक्षर व अशिक्षित माणसे म्हणजे आपल्या राष्ट्रावरील कलंक आहोत व आमच्या सारख्यांमुळे तुम्हाला शरमेने मान खाली घालावी लागते हा तुमचा कळीचा मुद्दा माझ्या लक्षात आला आहे.

७. आजपर्यंत तुम्ही केलेला उपदेश मी अतिशय आदरपूर्वक व शांतपणे ऐकलेला आहे. पण आता मी काय सांगतो ते तुम्ही लक्षपूर्वक ऐकण्याची वेळ आली आहे.

८. कृपया या गोष्टीची नोंद घ्या की मी सुद्धा मुळाक्षरे गिरवतो, कदाचित ती तुमच्या सारखी पाटीवर किंवा कागदावर नसतील. माझी कुदळ हीच माझी लेखणी. माझ्या शेतातील, 'सुजलाम् -सुफलाम्' अश्या धरित्रीवर मी माझी मुळाक्षरे गिरवितो. माझ्या मुळाक्षरांचे फलीत हे तुमची दोन वेळची भूक शमविण्यास समर्थ आहे व तुम्ही ते अधाशीपणे आणि विनातक्रार खाऊन टाकता.

९. उलटपक्षी तुमच्या हातात कुदळीच्या जागी पेन असते व तुम्ही कागदावर मुळाक्षरे गिरवता आणि या कागदी-शेतीतून तुम्ही काय पिकवता हे माझ्यासाठी खरोखरच एक कोडं आहे. तुम्हाला तरी या कोड्याचे उत्तर माहित आहे का?

१०. दुध,दही,लोणी या सारख्या दुग्धजन्य पदार्थांचा वापर करण्यापासून स्वत:ला तुम्ही अजिबात थांबवू शकत नाही तरीही दुभत्या गायी, म्हशी व बकऱ्या यापासून तुम्ही जाणीवपूर्वक दूर रहाता.

११. तुमच्या आणि माझ्या जीवनशैली मध्ये अगदी जमीन-अस्मानाचा फरक आहे. मी दिवस-रात्र शेतामध्ये काहीतरी उत्पादन करण्याच्या कामामध्ये गढलेला असतो व माझ्या शेतामध्ये आलेली उत्पादने उदा. अन्नधान्य, भाजीपाला, दूधदुभते व फळफळावळ यांचा समाचार घेण्यात तुम्हीं कायम व्यग्र असता आणि असं असूनही तुम्ही सदैव अतृप्त व असमाधानी असता व तुमच्या

अवतीभवतीच्या समाजामध्ये असंतुष्टताच अधिक आढळते. या उलट मी मात्र शांत, समाधानी व समृद्ध आयुष्य जगत आहे.

१२. माझी कार्यक्षमता व निसर्गाशी असलेले माझे नाते मला रोज काहीना काहीतरी नवीन शिकण्याची व अधिकाधिक समृद्ध होण्याची संधी मिळवून देते, याउलट तुम्ही मात्र तुमच्या वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाशिवाय तुमच्या शिक्षणाचा मार्ग चोखाळू शकत नाही.

१३. तुमचे जे शिक्षण आहेना ते फक्त तुमच्या पुस्तकापुरतेच मर्यादित आहे, केवळ पुस्तकी ज्ञान! पण माझं स्वत:च संपूर्ण अस्तित्वच शिक्षणाचा एक परिपूर्ण स्त्रोत आहे.

१४. तुमच्या शाळेमध्ये खरं जे शिक्षण आहे, ते कधीच मिळत नाही. तुमच्या शाळा म्हणजे शिक्षणक्षेत्रातील निव्वळ व्यापारी संस्था आहेत. मी सतत ज्याच्या सहवासात असतो तो (निसर्ग) व ज्या कामात मी सतत व्यस्त असतो ती कार्यप्रवणता हेच खऱ्या शिक्षणाचे स्रोत आहेत.

१५. माझ्या शैक्षणिक नैपुण्याबद्दल तुम्ही अगदीच अनभिज्ञ आहात. आता मी तुम्हाला सांगतो कि मी एक हाडाचा शेतकरी आहे. शेतीतज्ञ म्हणा हवे तर. दुग्ध-व्यवसायात मी अगदी तरबेज आहे. अहो एवढंच कशाला, या भागातील जी बोलीभाषा आहे त्यामध्ये मी अगदी प्रवीण आहे.

१६. माझं शिक्षण हे मुल:ताच अतिशय विश्वसनीय व स्पष्ट आहे, त्यामुळे त्याची विश्वासार्हता सिद्ध करण्यासाठी मला कोणत्याही प्रकारच्या प्रशस्ती-पत्रकांची गरज वाटत नाही.

१७. मुलभूत शिक्षण हे निव्वळ आकडेमोड व मुळाक्षरे यांच्यामध्ये गुरफटलेली किंवा त्यापुरतीच सिमीत असलेली गोष्ट नव्हे. निव्वळ शाळेच्या चार भिंतींमध्ये कोंडून मुलभूत शिक्षण घेता येत नाही.

१८. हे सर्व जग जसा ईश्वर व्यापून राहिला आहे त्याप्रमाणे या विश्वातील सर्व अणुरेणुमध्ये ज्ञान भरलेले आहे. शिक्षण हि सगळे अडथळे दूर करून अखंड अविरत चालणारी अशी एक साधना आहे.

१९. तुमचे शालेय-शिक्षण हे ठराविक साच्याचे, कंटाळवाणे, न बदलणारे असे असुन शिक्षणाच्या विविध अंगांना पोषक असे अजिबात नाही. उलट शिक्षणाचे अनंत असे स्वरूप हा एक अभूतपूर्व असा वैश्विक अनुभव आहे.

२०. 'उठा पहाट झाली' असं म्हणून कोंबडे जरी आरवल नाही तरी दिवस उगवायचा थोडाच रहातो? त्याचप्रमाणे एखाद्या ठिकाणी तुम्ही शाळा उघडून ती चालवली नाहीत तरी शिक्षणाची प्रक्रिया ही अतिशय सहजतेने व मुक्तपणे सुरु होते व ती अखंड चालूच रहाते.

२१. मला अधिक शिक्षण घेण्याची गरज आहे हे नाकारण्याइतका मी उध्दट खचितच नाही. परंतु माझे शिक्षक होण्याची योग्यता तुमचे ठायी कितपत आहे याबद्दल मी जरा साशंक आहे. या भूमिकेसाठी तुम्ही खऱ्या अर्थाने सुसज्ज आहात असे मला मनापासून वाटत नाही.

प्रकरण २ रे

'शिक्षण घेतलेली व्यक्ती खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाली असती तर समाजाला एवढ्या मोठ्या पोलीसदलाची गरजच लागली नसती'

२२. माझ्या प्रिय साक्षरता प्रसारक बांधवानो मला मोठ्या खेदाने म्हणावेसे वाटते कि तुम्हाला 'खरे शिक्षण म्हणजे काय?' याचे मर्मच समजलेले नाही आणि अगदी याच गैरसमजामुळे तुम्ही स्वत:ला शिक्षित समजता.

२३. एखाद्या व्यक्तीच्या निव्वळ बाह्यरुपामध्ये अथवा बोलीभाषेमधे फरक पडणे याचा अर्थ खरे शिक्षण असा होत नाही. उलटपक्षी ज्यामुळे एखाद्या व्यक्तीचे नैतिक आचरण, वृत्ती व स्वभाव यामध्ये सुस्पष्ट असा फरक पडून त्याच्या आचरणाची पातळी उंचावते ते खरे शिक्षण होय.

२४. खरा सुशिक्षित माणूस निर्माण प्रक्रियेत सहभागी झाल्याशिवाय उपभोक्ता होणार नाही. खरा सुशिक्षित माणूस हा स्वार्थीपणाने फक्त स्वत:साठी कधीही सर्व गोष्टी मिळवणार नाही. उलटपक्षी त्यातील काही भाग इतरांना तो नक्कीच देईल.

२५. सुशिक्षित माणूस स्वत: खाण्याआधी इतरांची भूक भागवेल. आपल्या दमलेल्या, थकल्या-भागल्या सहचरांना कधीही वाऱ्यावर सोडून देणार नाही. उलटपक्षी तो त्यांची योग्य ती काळजी घेईल.

२६. जो आपल्याला दुबळ्या माणसांपुढे आपण शूर-वीर आहोत असा आव आणणार नाही व जे आपल्यापेक्षा बलाढ्य आहेत त्यांच्यापुढे उगाचच माघार घेणार नाही किंवा त्यांचे वर्चस्व मान्य करणार नाही तोच खऱ्या अर्थाने सुशिक्षित होय.

२७. आपले कर्तव्यकर्म हे संपूर्ण समर्पण भावनेने व निष्ठेने पार पाडणे हेच खरे शिक्षण! जीवनामध्ये सतत 'सत्यं, शिवम् व सुंदरम्' यांचे अधिष्ठान राखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हेच खरे शिक्षण होय.

२८. खरे शिक्षण हे एखाद्या विषयाचे ज्ञान किंवा त्यात कौशल्य संपादन करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. तसेच अनेक प्रमाणपत्र मिळविणे किंवा अनेक परीक्षांना सामोरे जाणे हा हि खऱ्या शिक्षणाचा अर्थ नाही. (तसे समजणे म्हणजे हि खरे शिक्षण नव्हे.)

२९. परीक्षेच्या तीन तासाच्या कालावधीत मर्यादित स्वरूपाच्या अभ्यासक्रमावर विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांच्या आधारे खऱ्या शिक्षणाची गुणवत्ता ठरवता येणे शक्य नाही. उलटपक्षी खऱ्या शिक्षणाची प्रक्रिया ही माणसाच्या अखेरच्या श्वासापर्यंत अविरत चालू असते.

३०. प्रत्येक खऱ्या अर्थाने शिक्षित माणसाच्या अंतर्यामी एक सुप्त असा रखवालदार बसलेला असतो तो त्याला नेहमी सत्याची कास धरावयास लावतो. तो कोणतेही दुष्कर्म करण्यापासून त्याला परावृत्त करतो.त्याच्या नीतीमत्तेचे रक्षण करून तो त्यापासून त्याला विचलीत होऊ देत नाही. त्यामुळे अश्या माणसाला वाईट कृत्यांपासून रोखण्यासाठी कोणा बाहेरच्या माणसाची गरज लागत नाही, त्याचे अंत:र्मनच हे काम करते व हे सर्व खऱ्या शिक्षणाने घडून येते.

३१. विश्वसनीय व निरक्षर असा माणूस, साक्षर पण अविश्वसनीय माणसापेक्षा शत:पटीने चांगला.

प्रकरण ३ रे

'माणसातील नैसर्गिक अशा सहकार वृत्तीचा शिक्षणामुळे ऱ्हास होतो'

३२. मुलांना शाळेमध्ये येऊन खेळण्याची विशेषत: मोकळ्या हवेत मैदानावर बागडण्याची तीव्र इच्छा असते. यापायी शाळेत येण्यासाठी मुले अगदी उत्साही असतात. परंतु शालेय शिक्षण मात्र मुलांच्या या नैसर्गिक उर्मीच्या विरोधात असते.

३३. मुलांना मनापासून शालेय शिक्षणाची ओढ वाटत नाही हे लक्षात आल्यामुळे शालेय व्यवस्थापन निष्ठुरपणे चढाओढीचे शस्त्र वापरून एकाच वर्गातील मित्रांमध्ये स्पर्धा निर्माण करण्यास उद्युक्त करते. यामुळे मुलांना शाळेविषयी जरी खरी गोडी वाटत नसली तरीही शालेय अभ्यासक्रमाविषयी मुलांच्या मनात ही स्पर्धा कृत्रिम आवड निर्माण करते. हि आवड निव्वळ भीतीपोटी व काळजीपोटी निर्माण होते.

३४. मनात इच्छा असो व नसो तो विद्यार्थी शाळेमध्ये जे काही शिकविले जाईल ते विनातक्रार शिकतो. स्पर्धा आणि चढाओढीच्या दुष्टचक्रामध्ये फिरणे हे त्याच्या भाळी लिहिलेले असते.

३५. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात आपल्या वर्गमित्राविषयी एक प्रकारची सुप्त असूया निर्माण होते. त्यांच्या मनातील परस्परांविषयीचे प्रेम, एकमेकांवरील विश्वास व आपापसातील सहकार्याची भावना संपूर्णपणे नष्ट होते.

३६. मुलांच्या ठायी असलेली समतेची भावना व सद्‌गुणांचे समाधान या गोष्टी शालेय परिक्रमेत जळून खाक होतात.

३७. इतरेजनांकडून आपली सेवा कशी करून घ्यायची हे शालेय-शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला बरोबर समजते. पण त्याचवेळी दुसऱ्यांची हि सेवा करावयाची असते ह्या गोष्टीची त्याला अजिबात जाणीव नसते. उपहासात्मक दृष्टीकोन व तर्कबुद्धी ह्या निसर्गदत्त देणग्यांच्या आधारे तो इतरांना कमी लेखतो व इतरांच्या सहभागाची जाणीवही ठेवत नाही.

३८. शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या पदवीधरांना, इतरांविषयी वाटणारी संवेदनशीलता व अनुकंपा या गोष्टी पूर्णपणे त्यागण्यास व पुन्हापुन्हा तसेच वागण्यास शाळाच उद्‌युक्त करते.

३९. इतरांनी अन्न शिजवण्याचे कष्ट घ्यावेत मी मात्र ते सुखनैव: खावे, मी बोलत असताना इतरांनी माझे बोलणे लक्षपूर्वक ऐकावे, मी दुसऱ्याची योग्यता ठरवावी, त्याची पात्रता पारखून घ्यावी; परंतु माझ्या बाबतीत हे ठरविण्याचा कोणालाही अधिकार नाही असा दृष्टीकोन शालेय शिक्षण घेतलेल्या माणसाचा असतो.

४०. फक्त मीच एकटा काय तो अतिशय महत्वाचा आणि शहाणा, बाकी इतर सर्व गौण आहेत. माझा मळा सदैव हिरवागार व बहरलेला असावा. मग इतरांची शेती पाण्याअभावी सुकून गेली तरी चालेल. शिक्षित लोकांची विचारधारा व वागणूक अशा प्रकारची असते.

४१. समाजातील श्रमजीवी वर्ग हा निरक्षर आहे हि खरी समस्या नव्हेच. परंतु समाजातील साक्षरवर्ग हा कोणत्याही प्रकारच्या कामाच्या विशेषत: शारीरिक

कष्ट ज्यामध्ये आहेत अश्या कामाचे वावडे असणारा आहे. आणि हीच खरी आजच्या समाजापुढील समस्या होय.

४२. अहो माझ्या शिक्षकांनो, साक्षरांच्या मनातील शारीरिक कष्टाची अढी दूर करण्यात जर तुम्ही यशस्वी झालात, तर श्रमजीवी वर्गातील निरक्षरता दूर करणे तुम्हाला सहज शक्य आहे.

४३. आपल्या विद्यार्थ्यामध्ये शारीरिक कष्टासंबंधी तिरस्कार निर्माण करण्याला शाळा खतपाणी तर घालतेच शिवाय आपले शालेय किंवा कार्यालयीन कामकाज या विषयी फारसा गंभीर दृष्टीकोन न ठेवण्याच्या वृत्तीला हि खतपाणी घालते.

४४. आपल्या शालेय व महविद्यालयीन अभ्यासक्रमांच्या परिक्षेत यशस्वी होण्यासाठी आपण जो अभ्यास केला त्यामुळे आयुष्यातील सर्वात महत्वाचे ईप्सित गाठले आहे अशी त्याची भावना होते व यामुळे अभ्यासक्रमाबाहय नेमलेल्या अवांतर गोष्टी शिकण्यासंबंधी त्याच्या मध्ये उत्साह व स्वारस्य उरत नाही.

****